# जोशी-बेडेकर महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर झालेल्या विद्यार्थ्यांचा पदवीप्रदान समारंभ संपन्न




(छाया : प्रफुल गांगुर्डे)

**जिल्हा टाईम्स ठाणे, दि.२०-** विद्या प्रसारक मंडळाच्या के.ग.जोशी कला आणि ना. गो. बेडेकर वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर झालेल्या विद्यार्थ्यांचा पदवीप्रदान समारंभ पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाची माजी विद्यार्थ्यांची संघटना सर्जचे कोषाध्यक्ष राजेंद्र साळवी

▸▸ पान ३ वर

# जोशी-बेडेकर महाविद्यालयात...

(पान १ वरून ) उपस्थित होते. या कार्यक्रमाला एकूण उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी उपस्थित ६२५ विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्रे देण्यात आली. या प्रसंगी राजेंद्र साळवी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाशी जोडून राहण्यासाठी महाविद्यालयाची माजी विद्यार्थ्यांची संघटना सर्ज यात सहभागी होऊन विविध सामाजिक कार्यात कृतिशील राहण्याचे आव्हान कोषाध्यक्ष राजेंद्र साळवी यांनी केले.

पदवीप्रदान सोहळा तीन सत्रात पार पडला. पदवीप्रदान सोहळा सुरू होण्यापूर्वी प्राचार्या डॉ.सुचित्रा नाईक यांनी विद्या प्रसारक मंडळाचे पदवी शपथपत्र म्हणून घेतले आणि पदवीप्रदान सोहळा सुरू करण्यात आला. कला विभाग, वाणिज्य विभाग, जनसंवाद व पत्रकारिता, बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, बॅचलर ऑफ फायनान्शियल मार्केट, बॅचलर ऑफ बँकिंग अँड इन्शुरन्स, बॅचलर ऑफ अकाँटिंग अँड फायनान्स तसेच मास्टर ऑफ मास कम्युनिकेश, मास्टर ऑफ आर्टस, मास्टर ऑफ अकाँटिंग, मास्टर ऑफ लायब्ररी सायन्स अशा विविध विभागाच्या विद्यार्थ्यांना पदवीप्रदान करून त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी प्राचार्या सुचित्रा नाईक मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यशस्वी करियर करताना सम ाजाचे ऋण विसरू नये व सम ाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळावी अशी आशा त्यांनी व्यक्त केली. महाविद्यालयाशी असलेली नाळ देखील कायम बांधलेली असावी असे वक्तव्य प्राचार्या डॉ.सुचित्रा नाईक यांनी केले. विद्यार्थ्यांबरोबरच महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमांचे विभाग प्रमुख, समन्वयक आणि विद्यार्थ्यांचे पालकही उपस्थित होते. प्राचार्या डॉ.सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रमाचे नियोजन अर्थशास्त्र विभाग प्रमुख आणि महाविद्यालयाच्या एनसीसी चे प्रमुख डॉ.दीपक साबळे, डॉ.रश्मी अग्निहोत्री, डॉ. अर्चना प्रभुदेसाई यांनी केले. या कार्यक्रमाचे तीन सत्रातील सूत्रसंचालन प्रा.अर्चना नायर, प्रा.दीप्ती चिंदरकर, प्रा.पूजा माळवे यांनी केल.